# मुंबई विद्यापीठ

अत्यंत महत्वाचे / हस्ते बटवडा

क्र.वि.क./ १९ /२०१३

परिपत्रक :-

विद्यापीठातील विविध विभागाचे संचालक /विभाग प्रमुख तसेच प्राचार्य, सर्व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व एम.सी.ए महाविद्यालये तसेच, संचालक, व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था व तत्सम महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, सहायक आयुक्त समाज कल्याण, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, भाग-१, चौथा मजला, आर.सी.मार्ग, चेंबूर (पु), मुंबई - ४०० ०७१ यांनी त्यांचे पत्र क्र.जा.क्र.स.आ.स.क./मुंउप/शिष्यवृत्ती/१२-१३, दिनांक १० जानेवारी, २०१३ नुसार मुंबई विद्यापीठात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यापासून जाणिव पूर्वक वंचित ठेवले जाते व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना ऑन लाईन अर्ज भरण्याचे प्रशिक्षण नसल्याने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नाही. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे फार्म भरुन देणेबाबत सोयी-सुविधा-संगणक उपलब्ध करुन द्यावे व विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्या बाबत विद्यार्थ्यांची गैर सोय होणार नाही याची दक्षता घ्यावी असे कळविले आहे.

या परिपत्रकाव्दारे आपणांस कळविण्यात येते की, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फार्म भरुन देणेबाबत सोयी-सुविधा-संगणक उपलब्ध करुन द्याव्यात व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गैर सोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच याबाबत असेही कळविण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संबंधित मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. तरीही वरील बाबत गैरसोय झाल्यास त्वरीत सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग, चेंबूर तसेच उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२ यांनाही कळविण्यात यावे.

दिनांक :- २२ जानेवारी, २०१३
स्थळ :- मुंबई - ४०००३२.

कुमार खैरे
(कुलसचिव)

---

विद्यापीठातील विविध विभागाचे संचालक /विभाग प्रमुख तसेच प्राचार्य, सर्व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व एम. सी. ए महाविद्यालये तसेच, संचालक, व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था व तत्सम महाविद्यालये.

कुमार खैरे